पुरोगामी विचाराचे
एकमत



# मुरूम येथील जिल्हा परिषद प्रशालेत सायबर गुन्हेगारीवर विभुतेचे मार्गदर्शन



**मुरुम : प्रतिनिधी**

मुरूम येथील जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारीबद्दल सुरक्षा विषयक मार्गदर्शन करण्यात आले. लातूर येथील श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज महाविद्यालयातील विद्यार्थिनी सहाना दयानंद विभुते हिने सायबर गुन्हे, सोशल मीडिया, मोबाईल ॲप्लिकेशन, यातून सायबर क्राईम, नागरिकांची होणारी अर्थिक फसवणूक, या समस्या कशा निर्माण होतात, याचे ज्वलंत उदाहरणावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यातून आपण, आपले कुटुंब व समाज कसे सुरक्षित राहू शकते, याची माहिती उपस्थितांना दिली.

ही कार्यशाळा प्रशालेत पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली गेली होती. यामुळे विद्यार्थ्यांना मोबाईल फोन, सोशल नेटवर्किंग, वेबसाईट वापर, यातील समस्या व उपाययोजना, याबद्दल माहिती मिळाली. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याधापक विजयकुमार देशमाने, शिक्षक शिवाजी कवाळे, हरिभाऊ माकणे, संतोष कडगंचे, प्रवीण ठाकूर, मोहन राठोड, संगिता माने, संगणक शिक्षिका संगिता घुले, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.